S.

(5)

9C/99/94 2082

.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, यांचे कार्यालय

**OFFICE OF THE COLLECTOR, MUMBAI SUBURBAN DISTRICT**

जि ल्हा नि यो ज न स मि ती-

**DISTRICT PLANNING COMMITTEE**

प्रशासकीय इमारत ९ वा माळा वांद्रे (पूर्व) मुंबई. ४०० ०५१

ADMINISTRATIVE BUILDING, 9 TH FLOOR BANDRA (EAST) MUMBAI 400 051

TEL .NOs. 2 655 00 66. 2651 47 42, 2655 67 99 FAX. 2655 68 05

क्रमांक : जिनिस 1033/का.03/खास्थाविका/2015-16/प्रमंआ/हुद/प्र.क्र.106/2082 दिनांक: 16/11/2015.

# खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना सन 2015-2016

## प्रशासकीय मंजूरी आदेश

वाचा :
1) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, यांचे शासन निर्णय क्र. खाविनि.1094/प्र.क्र.12/का.1445, दि. 17 मार्च, 1994.
2) भारत सरकार, कार्यक्रम कार्यान्वयन विभाग मंत्रालय नवी दिल्ली यांचे आदेश क्र. सी./22/2004, एमपीएलअेडीएस, दि. 1/6/2005.
3) भारत सरकार, कार्यक्रम कार्यान्वयन विभाग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील नवीन मार्गदर्शक सूचना 15 मे 2014.
4) मुख्य अधिकारी, मु.झो.सु.मंडळ यांचे पत्र क्र. जा.क्र./का.अ./(पूर्व)/उप-1/मुं.झो.सु.मं/ 365/15, दि. 16/10/2015

ज्या अर्थी स्थानिक निकडीची कामे करण्याकरीता "केंद्र शासन पुरस्कृत खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना अंतर्गत" केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करून त्याचा विनियोग करण्याचे व या कार्यक्रमांतर्गत कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत, त्या अर्थी, मी **शेखर चन्ने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा** या आदेशाच्या जोडपत्रात नमूद केलेल्या कामांना खालील अटी, शर्ती व निकष यांच्या अधीन राहून तसेच केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाच्या अधिन राहून प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**अटी व शर्ती :-**

1. केंद्र शासनाच्या कार्यक्रम कार्यान्वयन विभाग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्वाच्या दि. **1 जून, 2005 च्या आदेशाच्या व १५ मे २०१४** मधिल नवीन मार्गदर्शक तत्वांच्या आधिन राहून सन **2015-16** या वर्षात प्रशासकीय मंजूरी प्रदान केलेल्या कामावरील खर्च भागविण्यात यावा.
2. जोडपत्रातील स्तंभ क्र.8 मध्ये दर्शविलेल्या रकमे इतकाच खर्च करण्यात यावा. निधी वितरीत करतेवेळी कार्यान्वयीन यंत्रणेकडे या पूर्वी दिलेला निधी व प्रत्यक्ष खर्चाची प्रगती पाहून केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे व महाराष्ट्र शासन **नियोजन विभाग, मुंबई यांचे आदेश क्र. खाविनि.1094 प्र.क्र.52(अ)/ का.1445, दि. 24 एप्रिल, 1995** च्या आदेशास अधिन राहून निधी वितरीत करण्यात येईल. काम पूर्ण झाल्यावर मंजूर रक्कमेतील बचत अन्य कोणत्याही कामाकडे परस्पर वळविणे अनुज्ञेय नाही.
3. या कार्यक्रमांवर होणा-या खर्चाचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवण्यात यावा. या कार्यक्रमाखाली स्थानिक स्वायत्त संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देय असलेल्या अनुदानाच्या खर्चासंबंधी महाराष्ट्र शासन निर्णय **क्र. डीपीसी-1084/सीआर-21, पीआर-2, दि. 26 ऑक्टोबर, 84 व दि. 17 नोव्हेंबर, 84 आणि क्रं. एसपीडी-1089/153/सीआर-15/योजना 6, दि. 31/08/1989** च्या शासन निर्णयानुसार आदेश पाळण्यात यावेत.
4. प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत योजना राबविणा-या कार्यन्वयिन अभिकरणांनी मासिक खर्चाचा कामनिहाय प्रगती अहवाल व पूर्ण झालेल्या कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.
5. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत कार्यन्वियन यंत्रणेच्या सक्षम अधिकाऱ्याने कामांस तांत्रिक मंजूरी देणे अनिवार्य असून जोडपत्रातील रकाना क्र.5 येथे दर्शविल्यानूसार यंत्रणेने सादर केलेल्या अंदाजपत्रकातील तांत्रिक मंजूरीच्या अधीन राहून कामास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.
6. **जागेचे नाहरकत प्रमाणपत्र संबंधीत जागा मालकाकडून/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावरच कामे कार्यान्वयित करणे ही संबंधीत कार्यान्वयीन अभिकरणाची सर्वस्वी जबाबदारी आहे.** जागेचे ना हरकत प्रमाणपत्र संबंधीत जागा मालकाकडून/ सक्षम प्राधिकाऱ्यांकडून (जिल्हाधिकारी /महानगरपालिका/ म्हाडा इत्यादी) प्राप्त केल्याशिवाय कामे कार्यान्वित करु नयेत. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली याचा अर्थ जागेचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले नाही.
7. इमारती बांधकामे, रस्ते, शौचालय इ.व इतर सर्व कामे घेण्यापुर्वी त्या ठिकाणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना **नोव्हेंबर, 2005 परिच्छेद 3.22 व पत्र दि. केंद्र शासनाचे पत्र क्र.c-06/2011-MPLADS (Pt.IV) दि, 25/07/2011** नूसारच फलक लावण्यात यावा म्हणजे सर्व संबंधित जनतेस कामाबाबत माहिती मिळू शकेल. स्थानिक लोकांकडून कोणताही न्यायालयीन गुंता निर्माण होणार नाही याची जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांनी घ्यावी. व तरीदेखिल असा काही न्यायालयीन गुंता झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी कार्यान्वयीन यंत्रणेचीच राहील याची नोंद घेण्यात यावी.
8. या कार्यक्रमात घेण्यात येणा-या कामाचे परिरक्षण व देखमालीचे हमीपत्र संबंधीत सक्षम प्राधिकरण/अधिका-याकडून घेणे बंधनकारक आहे. हमीपत्र असल्याचे खात्री केल्याशिवाय कामे कार्यान्वित करु नयेत. त्याचप्रमाणे घेण्यात येणारी कामे

Ex. Engg. BASI/MSIB
J.O.R. No 2082
Date 20/11/15
To D.E.

E:\ADHAV\ORDERS\Adm2015-16\Hussain Dalwai\Adm-2015-16-Hussain Dalwai.doc

DE-I. for note and necessary action pl.
DB

ही धार्मिक श्रध्दास्थाने/परीसरामधिल तसेच वैयक्तिक लाभार्थी, किंवा खाजगी को-ऑप सोसायटी, सहकारी वा वाणिज्यिक स्वरुपाच्या मर्यादित संस्थासाठी असल्यास कार्यान्वित करु नयेत.

9. या कार्यक्रमातून कोणत्याही स्वरुपाची दुरुस्तीची कामे (विशेष दुरुस्ती वगळून) अनुज्ञेय नाहीत.

10. **<u>सदर कामासाठी नोडल जिल्ह्याकडून प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्याशिवाय काम सुरु करण्यात येवू नये</u>**. निधी प्राप्त होताच तसे यंत्रणेस कळविण्यात येईल. या आदेशान्वये मंजूर कामे काम सुरु करण्यास कळविण्यात आल्यावरच कार्यन्वित करण्यात यावीत. **खासदार स्थानिक विकास कार्यक्रम मार्गदर्शक सुचना** 3.13 नुसार प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली कामे मंजुरी आदेशाच्या दिनांकापासुन 1 वर्षाच्या आत पुर्ण करणे अनिवार्य असुन मुदतवाढीबाबत कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही. या प्रशासकिय मंजुरी आदेशानुसार यंत्रणेने काम सुरु केल्यास सदर कामाबाबत उदभणारी भविष्यकालीन आर्थिक तसेच इतर जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची न राहता कार्यन्वयण यंत्रणेची राहील.या बाबत यत्रंणेने नोंद घेण्यात यावी.

11. घोषित किंवा नोटीफाईड न झालेले गलिच्छ वस्तीमध्ये कोणत्याही प्रकारची कामे या कार्यक्रमातून घेण्यात येऊ नये याची दक्षता संबंधीत कार्यान्वयिन यंत्रणानी घ्यावी. तसेच एस.आर.ए.स्कीम लागु असलेल्या जागेवर कोणतेही काम घेवू नये.

12. या आदेशानुसार मंजूर करण्यात आलेली जोडपत्रातील कामे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम/नगरसेवक निधी व इतर केंद्र पुरस्कृत व राज्य शासनाच्या वार्षिक योजनांतर्गत कामे सौंदर्यीकरण, नागरी दलित वस्ती सुधारणा योजना इ. योजनेतून/कार्यक्रमातून घेण्यात आलेली असल्यास कार्यन्वित करण्यात येऊ नये.

13. केंद्र शासनाचे पत्र **क्र.c-07/2006-MPLADS दि. 21/08/2006** नूसार कामाच्या प्रगतीबाबत मा.खासदारांना वारंवार अवगत करावे तसेच मा.खासदारानां कामाच्या उदघाटनाच्या वेळी आमंत्रित करण्यात यावे.

14. मंजूर केलेली बांधकामे जसे बालवाडी, समाजकल्याण केंद्र, वाचनालय, अभ्यासिका, व्यायामशाळा इत्यादी बांधकामे व इतर कामे पूर्ण झाल्यानंतर 90 दिवसाच्या आत जनतेच्या सार्वजनिक वापरात येतील याची दक्षता संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणांनी घ्यावी. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना **१५ मे २०१४ परिच्छेद** 3.22 **व परीशिष्ठ** V मध्ये नमुद अटीची पुर्तता करुन तसेच शासनाने विहित केलेल्या करारनामा कार्यान्वयीन यंत्रणांनी नोंदणीकृत संस्थेकडून करुन घ्यावा. वास्तु नोंदणीकृत संस्थेस हस्तांतरीत करतेवेळी या कार्यालयाचे पत्र क्रं. **जिनिवि/1098/का.03/स्थाविका/हस्तांतरण/93, दि.12/6/1998** अन्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे सर्व कागदपत्रांची (करारनामा, हस्तांतरण आदेश, खासदाराचे शिंफारस पत्र व इतर ) पूर्तता करुनच कार्यान्वयीन यंत्रणांनी वास्तु संबंधीत संस्थेस हस्तांतराबाबतचे आदेश द्यावेत. वास्तु हस्तांतरीत केल्यानंतर संबंधीत नोंदणीकृत संस्थेस आवर्ती किंवा अनावर्ती खर्चासाठी या योजनेअंतर्गत कसलेही अर्थ सहाय्य मिळणार नाही. हस्तांतरणाची कार्यवाही वेळेत न केल्याने जर बांधकामाचे काही नुकसान झाले किंवा वास्तुचा/कामाचा उपयोग जनतेला होणेसाठी बाधा आली तर त्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

15. या कार्यक्रमातून निर्माण होणाऱ्या वास्तुला/कार्याला (Assets) कोणत्याही संस्था/व्यक्तीच नाव देण्यात येऊ नये.

16. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना **15 मे 2014 V Annex-VII** अनुसार व या कार्यालयाच्या विहीत नमून्यातील उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत काम पुर्ण झाल्यानंतर या कार्यालयास पाठवावी. लेखा तपासणी साठी आवश्यक माहिती कार्यान्वयीन अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे.

17. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत काम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी जनतेला दिसेल अशा जागी खासदार स्थाकि क्षेत्र विकास योजोअंतर्गत माहिती दर्शविणारा कायमस्वरुपी व सुव्यवस्थित (Stone /metal) नामफलक पुढील नमूण्यात लावावा

**खासदार स्थानिक विकास कार्यक्रम योजना अंतर्गत**

| | |
|---|---|
| **मा.खासदार** | **(मा. खासदार महोदयांचे नाव)** |
| **कामाचे नाव** | .............................................. |
| **काम सुरु केल्याचा दिनांक** | .............................................. |
| **काम पूर्ण झाल्याचा दिनांक** | .............................................. |
| **मंजूर रक्कम** | .............................................. |
| **इतर स्त्रोताची रक्कम** | .............................................. |
| **उध्दघाटन** | .............................................. |

18. खासदार निधीतून सेटेंज चार्जेस अनुज्ञेय नसल्यामुळे ते दिले जाणार नाहीत. खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम **सन 2015-16 अंतर्गत कार्यान्वयीन अभिकरणांना कामाच्या पूर्ततेसाठी 15,00,000 /- (अक्षरी रुपये पंधरा लाख फक्त ) निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | कामाची अंमलबजावणी करणा-या अभिकरणाचे नांव | मंजूर कामांची संख्या | प्रशासकीय मंजूरीची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1. | कार्यकारी अभियंता (पूर्व / पश्चिम) मुं.झो.सु.मंडळ मुंबई | 5 | 15,00,000 |
| एकुण प्रशासकीय मंजूरीची रक्कम (रुपये पंधरा लाख फक्त) | | | 15,00,000/- |

**स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे स्वाक्षरीत.**

**- स्वाक्षरी/-**
**(शेखर चन्ने)**
**जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा.**

सोबत : जोडपत्र

**प्रति,**

कार्यकारी अभियंता (पूर्व) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-51.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता अग्रेषित**

1. मा. खा.श्री.हुसेन दलवाई, राज्यसभा सदस्य, यांना माहितीसाठी सादर.
2 मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई -400 051.
3. मुख्य लेखाधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ ,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई -400 051
4. निवडनस्ती (का.-03)

**जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हाकरीता**

प्रशासकीय मंजुरी आदेश क्रमांक:- जिनिस-1033/का.03/खास्थाविका/2015-16/प्रमंआ/हुद/प्र.क्र.106/2082, दि.16 /11/2015.

## प्रशासकीय मंजुरी आदेश जोडपत्र

खासदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2015-16 अंतर्गत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेल्या कामांची यादी.

**मा. खासदार श्री हुसेन दलवाई ,** **मतदार संघ: राज्यसभा सदस्य**

| अ. क्र. | कामाचे स्थानिक विवरण | कामाचा प्रकार / स्वरूप | खासदाराचे पत्र क्र. व दिनांक | अंदाजपत्रक प्राप्त क्र. व दिनांक | अंमलबजावणी अभिकरणाचे नांव | अंमलबजावणी रक्कम रूपये | मंजुर केलेली रक्कम रूपये. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | विष्णू टॉवर, पी.के.रोड, मुलुंड (प), जवळ मुंबई | पेव्हर ब्लॉक बसविणे | 17.06.2015 | 16.10.2015 | मुं.झो.सु.मं. | 300000 | 300000 |
| 2. | ब्रम्हा टॉवर, केशवपाडा, मुलुंड (प), जवळ, मुंबई येथे | पेव्हर ब्लॉक बसविणे | 17.06.2015 | 16.10.2015 | मुं.झो.सु.मं. | 300000 | 300000 |
| 3. | श्रीराम नगर, बालमित्र मंडळ, पी के रोड, मुलुंड (प), जवळ, मुंबई येथे | पेव्हर ब्लॉक बसविणे | 17.06.2015 | 16.10.2015 | मुं.झो.सु.मं. | 300000 | 300000 |
| 4 | केशव पाडा, श्रीराम नगर, मुलुंड (प), जवळ, मुंबई येथे | पेव्हर ब्लॉक बसविणे | 17.06.2015 | 16.10.2015 | मुं.झो.सु.मं. | 300000 | 300000 |
| 5 | ओमकार टॉवर, मुलुंड (प), जवळ, मुबंई येथे | पेव्हर ब्लॉक बसविणे | 17.06.2015 | 16.10.2015 | मुं.झो.सु.मं. | 300000 | 300000 |
| | **एकुण रक्कम रूपये पंधरा लाख फक्त** | | | | | | **1500000** |

टिप:-

1. उपरोक्त यादीतील बांधकामे विहित नमुन्यात देखभाल/हस्तांतरण करारनामा केल्याशिवाय सुरू करू नयेत.
2. बांधकामाच्या ठिकाणी जागेचे ना हरकत प्रमाणपत्र जागेच्या मालकाकडुन/सक्षम अधिका-याकडून घेतल्याशिवाय कामे कार्यान्वित करू नये.
3. उपरोक्त कामे जर फक्त विशिष्ट को.ऑप.हौ.सोसायटीच्या क्षेत्रात / आवारात मर्यादीत लाभासाठी असल्यास ती कार्यान्वित करण्यात येवू नयेत. सदर कामे परिसरातील जनतेच्या उपयोगासाठी आहेत याची खात्री करूनच हाती घेण्यात यावीत.
4. उपरोक्त कामे दुरूस्ती स्वरूपाची नसून नव्याने करण्यात येत आहेत या अटिस अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत याची नोंद घ्यावी.
5. सदर कामे ही धार्मिक स्थळाच्या / धार्मिक श्रध्दा स्थानाच्या परिसरामध्ये असल्यास कार्यान्वित करण्यात येऊ नयेत.

6. प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत असलेले काम मंजूरी दिनांकापासून 1 वर्षाच्या आत पुर्ण करण्यात यावे. तसेच निधी खर्च न झाल्यास व केन्द्र शासनाकडून निधी प्राप्त न झाल्यास याबाबतची आर्थिक जबाबदारी कार्यान्वित यंत्रणेची राहील.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

DB

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
OFFICE OF THE COLLECTOR, MUMBAI SUBURBAN DISTRICT
जि ल्हा नि यो ज न स मि ती
DISTRICT PLANNING COMMITTEE
प्रशासकीय इमारत ९ वा माळा वांद्रे (पूर्व) मुंबई. ४०० ०५१
ADMINISTRATIVE BUILDING, ९ TH FLOOR BANDRA (EAST) MUMBAI ४०० ०५१
TEL .NOs. २ ६५५ ०० ६६. २६५१ ४७ ४२, २ ६५५ ६७ ९९ Email- dpomsd@gmail.com FAX. २६५५ ६८ ०५

क्रमांक:जिनिस १०२९/का.०२/जिवायो/सौंदर्यीकरण /२०१५-१६/प्रमंआ/प्र.क्र.१९/ ७५० , दिनांक :- २२ . ०३ . २०१६

# जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६
## परिसर सुंदर बनविण्याचा कार्यक्रम (सौदर्यीकरण) कामांचे
## प्र शा स की य मं जू री आ दे श

**वाचा:**

१) महाराष्ट्र शासन,नियोजन विभाग, शासन निर्णय क्रं. जिवायो-१००७/प्र.क्र ३९/का.१४४४,दि.१६.०२.२००८.

२) अर्थसंकल्पीय अंदाज २०१५-१६ भाग-दोन खर्चाचे तपशिलवार अर्थसंकल्पीय अंदाज खंड-३, ओ-१५ नियोजन विभाग, जिल्हा नियोजन मुंबई उपनगर.

३) मुख्याधिकारी,मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,यांचे पत्र क्र./मुअ/काअ/पुर्व/उपअ-१/पुर्व/मुंझोसुमं/१४६/१६, दि. २७.२.२०१६.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत वरील संदर्भ क्रं.१ व २ अन्वये " बृहन्मुंबईचे सौंदर्य वाढविण्यासाठी महानगरपालिकेला सहाय्यक अनुदान " या योजनेअंतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून सदरहू योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचेकडे सपुर्द करण्यात आलेला आहे. तसेच सदर रकमेचा विनियोग करण्यासाठी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

या योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीतून प्रती मतदारसंघ उपलब्ध निधीच्या अधीन राहून त्यानूसार मुंबई उपनगर जिल्हयातील बृहन्मुंबई सौंदर्यीकरण विषयक सुधारणा करण्यासाठी घ्यावयाच्या कामांचे प्राप्त झालेल्या प्रस्तावांनुसार मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ या यंत्रणेने सादर केलेल्या कामांच्या अंदाजपत्रकांच्या अनुषंगाने व उपलब्ध निधीच्या अधीन राहून बृहन्मुंबई सौंदर्यीकरण विषयक सुधारणा करण्यासाठी या योजनेअंतर्गत कामांना मी शेखर चन्ने, जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा, खालील अटी व शर्ती तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाच्या अधीन राहून या आदेशासोबतच्या जोडपत्रातनमुद केलेल्या कामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करीत आहे.

**कामे कार्यान्वीत करण्यासंदर्भात अटी व शर्ती .**

१. या कार्यक्रमावरील खर्च पुढील लेखा शित्षांतर्गत सन २०१५-१६ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजना,मुंबई उपनगर जिल्हा करिता उपलब्ध केलेल्या तरतुदीमधुन भागविण्यात यावा.

**नियोजन विभाग, "मागणी क्र. ओ-१५,**
**३४३५, परिस्थितीकी व पर्यावरण "**
**०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध**
**"(३२) जिल्हा योजना - मुंबई उपनगर "**
**"(३२) (०२) बृहन्मुंबई सौंदर्य वाढविण्यासाठी महानगरपालिकेला सहाय्यक अनुदान (३४३५ ०५९२)**
**३१ सहाय्यक अनुदाने " (वेतनेतर)**

२. या कार्यक्रमावर होणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा, कार्यान्वयीन अभिकरणांना उपलब्ध केलेला निधी "सहाय्यक अनुदान"समजण्यात यावे आणि प्रचलित लेखापद्धती वापरण्यात यावी. अनुदानाच्या खर्चासंबंधीत शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डीपीसी-१०८४/सीआर-२१,पीआरजी-२,दि.२६ ऑक्टोंबर,१९८४ व दि.२७ नोव्हेंबर, १९८४ या शासन निर्णयान्वये दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

(कृ.मा.प.)

३. या आदेशानुसार मंजूर करण्यात आलेली कामे इतर कोणत्याही योजनेतून/कार्यक्रमातून घेण्यात (उदा.खासदार/ आमदार स्थानिका विकास कार्यक्रम/नगरसेवक निधी इ.) आलेली नाहीत याची खात्री करूनच कामाला सुरूवात करावी.

**४. उपरोक्त योजनेतून मंजूर करण्यात आलेली कामे ही मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय सूरु करु नये. सदर अटीची पुर्तता न केल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी यंत्रणेची राहील.**

५. या आदेशान्वये मंजूर प्राप्त कामांच्या संकल्प चित्रात /अंदाजपत्रकीय रक्कमेत कोणत्याही प्रकारचे बदल करण्यात येऊ नयेत याची नोंद घ्यावी.

६. संबंधीत मंत्रालयीन विभागाकडुन याविषयी निर्गमीत झालेल्या मार्गदर्शक सुचना निकष, व तपासणी याद्या त्यांच्या अनुषंगाने सदरील कामे अनुज्ञेय आहे त्याबद्दल खात्री करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

७. प्रशासकीय मंजूरी नंतर कार्यान्वयीन अभिकरणांनी त्यांच्या विभागातील संबंधीत सक्षम अधिका-याकडून तांत्रिक मंजूरी घेतल्यानंतरच कामास सुरुवात करण्यात यावी.

८. रस्त्याचे/तलावाचे सौंदर्यीकरण,रस्त्यालगत पायवाटा (फुटपाथ) मोकळयाजागेचे मैदानात/उद्यानात रुपांतर करणे,वाहतुक बेटे इत्यादी कामे महानगरपालिका मालकीच्या जागेवरील बांधकामे महानगर पालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र व परीरक्षण तथा देखभाल व दुरुस्ती बाबत हमी पत्र संबंधीत सक्षम महानगरपालिका अधिका-याकडून कार्यान्वयीन अधिका-याने प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच संबंधीत संस्थाकडून (महानगर पालिका,म्हाडा इत्यादी) किंवा अभिकरणाकडून परिरक्षण तथा देखभाल व दुरुस्ती बाबतचे हमीपत्र घेतल्याशिवाय कामे कार्यान्वयीन केली जाणार नाहीत याची संपूर्ण दक्षता कार्यान्वयीन अभिकरणांनी घ्यावयाची आहे.प्रस्तावित कामे ही वैयक्तीक लाभधारकाची /खाजगी /सहकारी संस्थेची नाहीत याची खात्री करुनच कामे कार्यान्वीत करण्यात यावीत.

९. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली याचा अर्थ जागेचे ना-हरकत प्रमाणपत्र दिले असे समजण्यात येऊ नये, नाहरकत प्रमाणपत्र संबंधीतांकडून प्राप्त करुन घेवूनच कामे कार्यान्वित करणे ही संपूर्ण जबाबदारी संबंधीत कार्यान्वयीन अभिकरणाची आहे. जागेचे ना हरकत प्रमाणपत्र संबंधीत जागा मालकाकडून प्राप्त केल्याशिवाय कामे कार्यान्वित करण्यात येऊ नयेत. तसेच या योजने अंतर्गत घेण्यात येणा-या कामाच्या ठिकाणी स्थानिक लोकांकडून कोणताही न्यायालयीन गुंता निर्माण होणार नाही याची जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांनी घ्यावी.

१०. कामाच्या गुणवत्ता संदर्भात, कार्यान्वित अभिकरणातील सक्षम अधिका-याने कामाची गुणवत्ता तपासावयाची आहे. गुणवत्तेची संपुर्ण जबाबदारी कार्यान्वयीन अभिकरनांवर राहील.

**११. सदर योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या जागी मंजूर कामाचे नाव, मंजूर रक्कम, झालेला खर्च व सदरचे काम हे जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ अंतर्गत परिसर सुंदर करण्याचा कार्यक्रम (सौंदर्यीकरण) योजनेतून घेण्यात आलेले आहे अशा आशयाचा फलक दर्शनी भागात लावण्यात यावा.**

१२. प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत योजना राबविणा-या अभिकरनांनी मासिक खर्चाचा काम निहाय प्रगती अहवाल विहीत प्रपत्रात जिल्हाधिकारी यांना सादर करावा, तसेच यासोबत पूर्ण झालेल्या कामांची प्रमाणपत्रे निधी खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्रे सुध्दा सादर करावीत.

१३. जोडपत्रामध्ये दर्शविलेल्या प्रशासकीय मंजुरीच्या रक्कमेइतकाच खर्च करण्यात यावा.

१४. या आदेशान्वये मंजूर केलेली कामे विहीत कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.

१५. काम पूर्ण झाल्यानंतर मंजूर रक्कमेतील बचत अन्य कामाकडे वळविण्यात येणार नाही अथवा बचतीतून नवीन कामांना प्रस्तांवाना मंजूरी देता येणार नाही. तसेच या योजने अंतर्गत घेण्यात आलेली कामे पूर्ण झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत जनतेच्या सार्वजनिक वापरासाठी पंजीकृत सस्थेस / स्थानिक स्वराज्य संस्थेस देखभाल तथा दुरुस्तीसाठी शासनाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन हस्तातंरीत करण्याबाबतची दक्षता कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावी.

**(पुढील पानावर)**

१६. लेखा तपासणीसाठी आवश्यक असणारी माहिती कार्यान्वयीन अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सदरच्या मंजूर रकमेचा प्रचलित शासकीय नियमानूसार विनियोग करुन त्याबाबतचे एकत्रित विनियोग प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करण्यात यावे.परिसर सुंदर बनविण्याचा कार्यक्रम (सौंदर्यीकरण) सन २०१५-१६ अंतर्गत कार्यान्वयीन अभिकरणांना कामाच्या पूर्ततेसाठी रु. ४९.७०/- लाख (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास लाख सत्तर हजार फक्त) इतक्या रकमेस प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाची अंमलबजावणी करणा-या अभिकरणाचे नांव | मंजूर कामांची संख्या | प्रशासकीय मंजूरीची रक्कम रु. (लाख) |
|---|---|---|---|
| १. | मुंबई झोपडपटटी सुधार मंडळ | ५ | ४९.७०/- |
| | एकुण | ५ | ४९.७०/- |
| (प्रशासकीय मंजूरीची एकुण रक्कम रुपये एकोणपन्नास लाख सत्तर हजार फक्त.) | | | |

**सोबत** :- जोडपत्र

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे.

सही/-
(शेखर चन्ने )
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती
मुंबई उपनगर जिल्हा

प्रतिः- मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**प्रत** माहितीसाठी योग्य त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित :

१) कार्यकारी अभियंता (पूर्व/पश्चिम),मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

२) मा. खा. श्री. हुसेन दलवाई, राज्यसभा सदस्य, यांना माहितीस्तव अग्रेषित सदर.

३) मुख्य लेखाधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

४) लेखा अधिकारी,जि.नि.स. मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

# प्रशासकीय मंजुरी आदेशाचे जोडपत्र

रिसर सुंदर बनविण्याचा कार्यक्रम (सौंदर्यीकरण) योजना सन २०१५-१६ अंतर्गत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर या

# प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेल्या कामांची यादी

HD

**क्रमांक जिनिस-१०२९/का.०२/वायो/सौंदर्यीकरण/२०१५-१६/प्र.क्र.१९/प्रमआ/७५० , दिनांक: २२ . ०३ . २०१६.**

| अ. क्र. | कामाचे स्थानिक विवरण | कामाचा प्रकार/स्वरुप | अंदाज पत्रक दि. | कार्यान्वयीन यंत्रणा | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (लाखात) | मंजुर केलेली रक्कम रु. (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नवीन वस्ती, ९० फिट रोड, गोवंडी, मंबई येथे | सौंदर्यीकरण करणे | २७.२. २०१६ | मुं.झो.सु.मं. | ९.९५ | ९.९५ |
| २ | संजय नगर, नविन एस.टी.डेपो जवळ, गोवंडी, मंबई येथे | सौंदर्यीकरण करणे | २७.२. २०१६ | मुं.झो.सु.मं. | ९.९५ | ९.९५ |
| ३ | संजय नगर, नविन एस.टी.डेपो जवळ, गोवंडी, मंबई येथे | लादीकरण करणे | २७.२. २०१६ | मुं.झो.सु.मं. | ९.९५ | ९.९५ |
| ४ | अयप्पा मंदिर जवळ, ९० फिट रोड, गोवंडी, मंबई येथे | सौंदर्यीकरण करणे | २७.२. २०१६ | मुं.झो.सु.मं. | ९.९० | ९.९० |
| ५ | नविन डेपो रोड, गोवंडी, मंबई येथे | पेव्हर ब्लाक व लादी बसविणे | २७.२. २०१६ | मुं.झो.सु.मं. | ९.९५ | ९.९५ |
| | | | | **एकुण** | **४९.७०** | **४९.७०** |

(प्रशासकीय मंजूरीची एकुण रक्कम रुपये एकोणपन्नास लाख सत्तर हजार फक्त.)

**स्थळ प्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.**

**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव**
**जिल्हा नियोजन समिती**
**मुंबई उपनगर जिल्हाकरिता**

Exe'

①B